नाशिक
दि.२७/०६/२०१९

# प्रेसनोट

## आलोसे लक्ष्मण नारायण काळे, कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय दिंडोरी, जि.नाशिक यांना ५००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांची कारवाई

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | नाशिक |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | कार्यवाही चालु आहे. |
| **कलम** | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपींचे नांव व कार्यालय** | लक्ष्मण नारायण काळे, कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय दिंडोरी, जि. नाशिक |
| **मागणी कलेली लाचेची रक्कम** | ५००/— रुपये |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ५००/— रुपये |
| **थोडक्यात माहिती** | यातील तक्रारदार यांचा कृषी साहित्य विक्रीचा व्यवसाय असून त्यांनी शेतक—यांना विक्री केलेल्या ठिबक सिंचनाचे शासकिय अनुदान मिळणेकामी तालुका कृषी अधिकारी कार्यालय दिंडोरी येथे प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव मंजूर करण्यासाठी आलोसे लक्ष्मण नारायण काळे, कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय दिंडोरी, जि. नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ५००/—रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी आज दि. २७/०६/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दि. २७/०६/२०१९ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे लक्ष्मण नारायण काळे, कृषी पर्यवेक्षक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय दिंडोरी, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे ५००/— रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम जनता विद्यालयाचे कोप—यालगत तालुका कृषी अधिकारी कार्यालय दिंडोरी कडे जाणारे रस्त्यावर स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय

संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in

ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन : acbmaharastra.net

टोल फ्री क्र. : १०६४

दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०

व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

पोलीस अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो नाशिक परिक्षेत्र, नाशिक

२७.६.१९

( दिनकर पिंगळे )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता